**आर.सी.सी. नं. २१६/२०१८**
**निशाणी क्रमांक ६९**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ याचा शपथेवर सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री. ए. पी. नागरे यांचेमार्फत सुरु

**देवा शपथ खरे सांगतो की,**

**माझे नाव** :- संगिता ज्ञानेश्वर गमे
**वय** :- ५५ वर्षे, **धंदा :-** होमगार्ड,
**राहणार** :- केलवड, ता. राहाता, जि. अहमदनगर

**१.** घटना दि. २२.०२.२०१५ रोजीची घटना आहे. मारामारी घडुन गेल्यावर मी घटनास्थळी गेले होते. तेथे मारामारी झालेली मी पाहिली. सोमनाथ डांगे व त्याच्या भावात मारामारी झाली होती. योगिता राजेंद्र हारदे माझी बहिण आहे. पोलीस ठाण्यात ती फिर्याद द्यायला गेली. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकते. आज आरोपी गैरहजर आहेत.

**(साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी वकीलांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.)**

**२.** हे म्हणणे खरे आहे की दि. २२/०५/२०१५ रोजी माझे मेव्हणे यांनी आरोपींना उसणे दिलेले पैसे परत मागितल्याच्या रागातुन आरोपींनी माझी बहिण योगिता हारदे हिचा हात ओढुन साडी फाडून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व तिला शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे आहे की तुम्हाला मारुन टाकु असे दम आरोपींनी तिला दिला होता. हे म्हणणे खरे आहे की माझी बहिण व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की तडजोड झाल्याने मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**वारंवार पुकारा केला असता आरोपी गैरहजर दुपारी ०३.१५ वाजेपर्यंत कोणताही मुदतीचा अर्ज नाही. आरोपीतर्फे विधीज्ञ गैरहजर. सबब फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९, २क प्रमाणे साक्षीदाराचा जबाब नोंदवण्यात आला. सबब आरोपीविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

दिनांक :-१५/०३/२०२४

( अं. आ. कुलकर्णी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता
(न्यायालय क्र.२)